तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट येवती संचलित,

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव

## मराठी विभाग वार्षिक अहवाल २०२४-२०२५

मराठी विभागामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये विविध उपक्रमाचे आयोजन केले होते. या शैक्षणिक वर्षामध्ये नियमित अध्यापन कार्यासाठी सत्रानुरूप अभ्यासक्रमाचा नियोजित आराखडा तयार करून त्याची पूर्तता करण्यात आली.

**प्रथम सत्र :**

१. **परिसंवाद:**

विद्यार्थ्यांनी चिकित्सक पद्धतीने विचार करावा, संभाषण कौशल्य व व्यक्तिमत्व विकास, भाषा संवर्धन, साहित्य निर्मिती आणि लेखकांची संवाद साधण्यासाठी महाविद्यालयात वर्गनिहाय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. तज्ञ व अभ्यासू मंडळींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२. **अंतर्गत मूल्यमापन :**

बी.ए प्रथम ,द्वितीय, तृतीय आणि बी.एससी, बी.कॉम, प्रथम, द्वितीय वर्षाच्या घटक चाचणी परीक्षांचे आयोजन करण्यात आले. व त्यांचे मूल्यमापनही करण्यात आले.

३. **भित्तिपत्रिका :**

स्वातंत्र्यदिनानिमित्त महाविद्यालयात देशभक्तीपर विविध माहितीचे व देशाच्या गौरवशाली कारकिर्दीचे विशेष लेख, कविता इ लिहिलेली भितीपत्रिका तयार करण्यात आली. यावेळी संस्थेचे विश्वस्त मा श्री शेषाद्री अण्णा डांगे, श्री कमलाकर बापू पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रशांत चौधरी, प्रा डॉ सहदेव रसाळ, प्रा डॉ कृष्णा तेरकर, प्रा डॉ मारुती गोरे, प्रा प्रमोद पाटील तसेच सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

**द्वितीय सत्र :**

दिनांक २३/१२/२०२४ ते २६/०४/२०२५ कालावधीत द्वितीय सत्र संपन्न झाले. या सत्रामध्ये प्राध्यापक निहाय निश्चित करण्यात आलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला.

१. **चोखोबा ते तुकोबा: एक वारी समतेची**

समता, बंधुता, मानवता आणि सामाजिक लोकशाही या वारकरी संप्रदायातील मूल्यांचा उत्कर्ष व संवर्धनासाठी संत चोखामेळा अध्यासन केंद्र पुणे चोखोबा ते तुकोबा : एक वारी समतेची मध्यवर्ती संयोजन समिती आयोजित एक वारी संस्थेची श्री संत चोखामेळा कर्मभूमी श्रीक्षेत्र मंगळवेढा ते श्री संत तुकोबाराय जन्मभूमी श्रीक्षेत्र देहू, पर्यंत ही वारी जाते. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक ४/०१/२०२५ रोजी महाविद्यालयामध्ये या वारीचे आगमन झाले. मराठी विभागाच्या वतीने या वारीचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष

श्री शेषाद्री आण्णा डांगे हे होते. प्रमुख उपस्थितीत , प्राचार्य डॉ प्रशांत चौधरी, श्री सचिन पाटील, श्री रामदास कोळगे, श्री सोमनाथ लांडगे, डॉ सहदेव रसाळ, हे उपस्थित होते. एक वारी समते विषयी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत चौधरी यांनी वारी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे. याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे असे म्हटले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री शेषाद्री अण्णा डांगे यांनी वारीची पार्श्वभूमी सांगून वारीही आज वर्तमान मध्ये किती महत्त्वाची आहे. त्याच्यातील नैतिक मूल्य आज कितपत पाळली जातात सांगून सर्व श्रोते वर्गांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार डॉ सहदेव रसाळ यांनी मानले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ कृष्णा तेरकर यांनी केले.

**२. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा :**

( दिनांक १४ जानेवारी ते २८जानेवारी )

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभाग यांच्यावतीने भाषा संवर्धन पंधरवडा चे उद्घाटन करण्यात आले. धाराशिव नगरीतील ज्येष्ठ कवी व भारत विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ रुपेश कुमार जावळे यांच्या शुभहस्ते भाषा पंधरवडा दिनाचे उद्घाटन करण्यात आले. आज वर्तमान परिस्थितीत शालेय शिक्षणात मराठी भाषेचे महत्व अनन्यसाधारण आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी मराठी माध्यमांच्या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढायला हवी. व त्यासाठी सरकार कडून विविध उपाययोजना करायला हवी. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्री मिलिंदजी पाटील साहेब यांनी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विविध विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

**३. मराठी भाषा गौरव दिन**

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी काव्य मैफिल व मार्गदर्शन हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून कवी प्राध्यापक डॉक्टर अरविंद हंगरगेकर यांचे काव्य मैफिल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कवी अरविंद हंगरगेकर यांनी माणसांच्या मनातील सुप्त जाणीवा अनेक कवितेच्या माध्यमातून गाऊन दाखवल्या. त्याचबरोबर महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कवितेचे वाचनही केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ सहदेव रसाळ यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ कृष्णा तेरकर यांनी केले.

४. याचबरोबर भीतीपत्रिक, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, निबंध स्पर्धा, इत्यादी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात विद्यार्थ्यांचा सहभाग उस्फुर्त होता.

**५. अंतर्गत मूल्यमापन:**

बीए. प्रथम, द्वितीय, तृतीय आणि बीएससी, बीकॉम प्रथम, द्वितीय वर्ष तसेच एम ए प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन करण्यात आले.

वरील प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४- २०२५ या वर्षामध्ये द्वितीय सत्रामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तरी सदरील अहवाल स्वीकारण्यात यावा ही विनंती.

VENKATESH MAHAJAN SR. C. OFFICE OSMANABAD

आपला विश्वासू

डॉ. सहदेव रसाळ

**PRINCIPAL**
**Venkatesh Mahajan Senior College**
**Dharashiv**